# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
## ग्राहक तक्रार निवारण मंच
## कोल्हापूर परिमंडळ, कोल्हापूर यांचे समोर

ग्राहक तक्रार क्र. ३१/२००९/ दिनांक :

श्रीमती शांताबाई शिवाजी शिंदे,
रा. ३९३५, संतपेठ, पंढरपूर,
ता. पंढरपूर, जि. सोलापूर अर्जदार

**विरूध्द**

१) कार्यकारी अभियंता (का.) तथा नोडल ऑफीसर,
म.रा.वि.वितरण कं.लि.,संवसु मंडळ कार्यालय,
सोलापूर विरूध्द पक्षकार

२) कार्यकारी अभियंता
म.रा.वि.वि. कंपनी मर्यादित,
विभागीय कार्यालय, पंढरपूर,
पोल फॅक्टरीजवळ, लिंक रोड, पंढरपूर– ४१३ ३०४

३) उप कार्यकारी अभियंता,
म.रा.वि.वि. कंपनी मर्यादित,
ग्रा.. २ उप विभागीय कार्यालय, पंढरपूर,
जि. सोलापूर.

**कोरम** :– १) श्री. के.वाय. जगताप, अध्यक्ष,
२) श्री. एस.आर. बांबळे, सदस्य–सचिव
३ श्री. जी.सी. लेले, सदस्य

महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोग
(ग्राहक तक्रार निवारण मंच)
विनियम २००६ मधील ८.२ चे तरतुदीनुसार

## <u>न्याय निर्णय</u>

<u>श्री. के.वाय. जगताप, अध्यक्ष, ग्रा.त.नि.मंच यांचे तर्फे</u> दिनांक : ०८.०६.२००९

सदरचा अर्ज अ नमुन्यामध्ये या कार्यालयास दि. २०.४.२००९ रोजी प्राप्त झाला. अर्जदाराचे म्हणणे की, विभागीय कार्यालय, पंढरपूर यांचेकडे मौंजे मेंढापूर, ता. पंढरपूर येथील गट क्र. ३५९ मध्ये विहीरीवर मोटरपंप वीज जोडणीसाठी मागणी केली. त्यांनी कोटेशन भरुन देखील अद्यापपर्यंत त्यांना वीज जोडणी मिळाली नाही. परिणामी, त्यांचे जमिनीतील उत्पादन न मिळाल्यामुळे नुकसान झाले. सबब अशी नुकसान भरपाई त्यांना भरुन मिळावी या बाबत अर्ज केला आहे. अशी नुकसान भरपाई रु. ७५,०००/– एवढी मागणी केली आहे. सदरील अर्जदााने नुकसान भरपाई मिळावी म्हणून अज केला आहे पण वीज जोडणी बाबत त्याची आमचेकडे विनंती नाही.

या प्रकरणी वि.प. यांना नोटीस देवून त्यांचे म्हणणे मागितले. त्याप्रमाणे वि.प.तर्फे दि. २९.५.२००९ रोजी म्हणणे प्राप्त झाले. त्यांच्या म्हणण्याप्रमाणे, अर्जदारास मौंजे मेंढापूर येथील गट क्र. ३५९ मध्ये शासनाच्या १००% अनुदानातून विहीर मंजूर होवून २००५–०६ मध्ये विहीर खोदून त्यास पाणी लागले या बाबतची नोंद ७/१२ चे उताऱ्यात नाही. तरी देखील अर्जदाराचे मागणीप्रमाणे दि. ४.१.२००६ रोजी त्यांना कोटेशन देण्यात आले. ग्राहकाने दि. ५.१.२००६ रोजी जरुर त्या पैंशाचा भरणा केला. दि. ६.१.२००६ त्यांनी तपासणी अहवाल दिला. तपासणी अहवालाप्रमाणे, प्रत्यक्ष जागेवर पाहणी केली असता, विहीरीवर वीज जोडणीसाठी संचाची मांडणी आढळून आली नाही. तरी देखील वि.प.तर्फे दि. ५.११.२००६ रोजी जरुर त्या वीज वाहिनीचे जाळे तयार करण्यात आले. परंतु ग्राहकाने विहीवर विद्युत संच मांडणी केली नाही तसेच मीटर बसविणेसाठी पेटीची व्यवस्था केली नाही. सबब दि. १२.१२.२००६ व दि. ११.१.२००७ रोजी ग्राहकास नोटीस देवून ग्राहकाने विद्युत संच मांडणी करणे व चाचणी अहवाल देणेबाबत पूर्तता करावी असे कळविण्यात आले. असे असतांनाही ग्राहकाने कोणत्याही प्रकारे मोटर पंप तसेच चाचणी अहवाल देणेबाबत पूर्तता केली नाही. सबब वि.प.तर्फे वीज वाहिनीचे जाळे व इतर व्यवस्था करुनही अर्जदाराच्या स्वत:च्या नाकर्तेपणामुळे वीज जोडणी करता आलेली नाही. यामध्ये वि.प.चा कोणताही दोष नाही असे त्यांचे म्हणणे आहे. पुढे वि.प.चे म्हणणे की, अर्जदाराने दि. ४.१२.२००९ रोजी कार्यकारी अभियंता (प्रशासन) यांचेकडे तक्रार केली होती. त्याबाबत चौंकशी करण्यात आली व त्याचा आदेश दि. २३.१.२००७ रोजी देण्यात आलेला आहे. त्या आदेशाप्रमाणे ग्राहकाने विहीरीवर विद्युत मोटर व पोलवर पेटी बसवून चाचणी अहवाल सादर करण्यास कळविण्यात आले आहे व असा अहवाल प्राप्त होताच वीज जोडणी करण्यात येईल. त्याप्रमाणे वि.प.तर्फे ग्राहकाकडून पूर्तता करताच वीज जोडणीची व्यवस्था तयार ठेवण्यात आलेली आहे. वि.प.चे पुढे असे म्हणणे की, अर्जदारास केवळ नुकसान भरपाई पाहिजे व अशाप्रकारे त्याने खोटा अर्ज केला. सबब रद्द करण्यात यावा. अर्जासोबत वि.प.तर्फे वरील म्हणण्याच्या पृष्ट्यर्थ सर्व कागदपत्रें दाखल करण्यात आलेली आहेत.

सदरील प्रकरणाची सुनावणी कोल्हापूर येथे आज रोजी ठेवली असता, अर्जदार स्वत: किंवा त्यांचे प्रतिनिधी हजर झाले नाहीत. वि.प.तर्फे कनिष्ठ अभियंता श्री. के.अे. मंगळवेढी हजर झाले व त्यांनी त्यांचे म्हणणे मांडले. अर्जदाराचा लेखी अर्ज व कागदपत्रें तसेच वि.प.तर्फे दाखल झालेले म्हणणे व कागदपत्रानुसार, खालील मुद्दे आमचे विचारार्थ उदभवतात.

मुद्दा क्र. १ : अर्जदाराने मागणी केल्याप्रमाणे वि.प.तर्फे वीज पुरवठा ग्राहकास देणे संबंधात वीज वाहिन्यांच्या जाळीची पूर्तता केली आहे काय ?

उत्तर : होय

मुद्दा क्र. २ : अर्जदाराने त्याचे विहीरीवर मोटर पंपसेट बसविणे बाबत व मीटर बसविणेसाठी जरुर ती व्यवस्था केले बाबत चाचणी अहवाल देणेची पूर्तता केली आहे काय ?

उत्तर : नाही

मुद्दा क्र. ३ : आदेश ?

उत्तर : अखेरच्या आदेशाप्रमाणे

कारणमिमांसा

सदरील प्रकरणामध्ये अर्जदार हे अल्पभूधारक शेतकरी असून त्यांना शासनाच्या रोजगार हमी योजनेतून १००% अनुदानातून विहीर मंजूर होवून तिची खुदाई झाल्याचे दिसते. त्याप्रमाणे त्या विहीरीवर मोटर पंप बसविणेसाठी अजदाराने वि.प.कडे मागणी अर्ज केल्याचे दिसते व कोटेशन प्राप्त होताच जरुर त्या रकमेचा भरणा वि.प.कडे केलेला आहे. तसेच सुरुवातीला चाचणी अहवालही दाखल केला. परंतु चाचणी अहवालाप्रमाणे प्रत्यक्ष जागेवर पाहणी केली असता दि. २.१.२००७ रोजी कोणत्याही प्रकारे मोटर पंप, केबल व मिटरसाठी पेटी अशी कांही व्यवस्था अर्जदारातर्फे करण्यात आलेली नव्हती. त्याचा रितसर पंचनामाही दि. २.१.२००७ रोजी केल्याचे दिसते व त्याची प्रत सादर केलेली आहे. तसेच दि. ११.१.२००७ रोजी अर्जदारास वि.प.तर्फे पत्र पाठवून वीज जोडणीसाठी जरुर ती पूर्तता करणे बाबत कळविण्यात आलेले आहे व त्याची स्थळप्रत प्रकरणात दाखल करण्यात आलेली आहे. या ऊलट, अर्जदार यांनी जिल्हाधिकारी यांना दि. २.१.२००६ रोजी पत्र पाठविल्याचे दिसत असून त्यामध्ये १००% अनुदानातून त्यांचे विहीरीवर विद्युत मोटर व ५०० फूट पाईप लाईन मिळणे बाबत अर्ज केल्याचे दिसते. अर्जदाराने त्या बाबतची मागणी जिल्हाधिकारी व वीज मंडळाकडे केल्याचे दिसते. ता. २१.१.२००६ रोजी अशी मागणी वीज मंडळाकडे अर्ज करुन केली आहे व त्याची प्रत सोबत जोडली आहे.

या प्रकरणामध्ये अर्जदारास शासनाच्या संबंधित योजनेप्रमाणे जे कांही अधिकार व सवलती प्राप्त होतात त्या बाबीशी वीज कंपनीचा संबंध नाही व त्याची पूर्तता वीज कंपनी करु शकत नाही.

वरील सर्व बाबींचा विचार करता असे दिसून येते की, अर्जदारास वीज कंपनीकडून विद्युत मोटर, तसेच लाईन व अन्य बाबी मोफत पाहिजे आहेत. परंतु त्या बाबतची पूर्तता करणे वीज मंडळाकडे येत नाही. परिणामी,

प्रत्यक्ष जागेवर अर्जदाराच्या विहीरीवर पंपसेट व अन्य जोडणी नसल्याने विद्युत जोडणी वि.प.तर्फे देण्याचा प्रश्नच उदभवत नाही. या ऊलट, वि.प.तर्फे जरुर ते वीज वाहिनीचे जाळे व खांब उभा करण्यात आलेने व वि.प.तर्फे अर्जदारास वेळोवेळी कळवून देखील अर्जदाराने मोटर पंप बसवून पूर्तता केलेली नाही. परिणामी, मुद्दा क्र. १ व २ कडे आमचे निष्कर्ष नोंदवित आहोत.

वरील कारणमिमांसेचा विचार करता, अर्जदारा अर्ज हा केवळ त्यांना बेकायदेशीर नुकसान भरपाई मागण्याचा दिसून येत आहे व असा अर्ज फेटाळणे क्रमप्राप्त ठरते. अशा अर्जाबाबत वास्तविक खर्चाचा आदेश करणे आवश्यक आहे परंतु अर्जदार हे अल्पभूधारक असलेने खर्चाबाबत आम्ही विचार करीत नाही. सबब

खालील प्रमाणे आदेश.



## <u>आदेश</u>

१) अर्जदाराचा तक्रार अर्ज क्र. ३१/२००९ फेटाळण्यात येत आहे.

२) खर्चाबाबत आदेश नाही.

३) या निर्णयाविरूध्द तक्रारदार यांना अपील करावयाचे असलेस त्यांना आदेशाच्या तारखेपासून ६० दिवसांचे आंत मा. विद्युत लोकपाल, केशवा, बांद्रा–कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रा (पूर्व), मुंबई–५१ यांजकडे करता येईल.

( के. वाय. जगताप )
अध्यक्ष
ग्राहक तक्रार निवारण मंच,कोल्हापूर

श्री. जी.सी. लेले, सदस्य :

श्री. एस.आर. बांबळे, सदस्य सचिव :